Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# भारतीय लेखन पध्दतीचा उदय आणि विकास

**प्रा. डॉ. कार्तिक शेषराव गावंडे**
इतिहास विभाग
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना

**प्रस्तावना:**

आधुनिक काळात इतिहास लेखन पध्द्तीला एक स्वतंत्र शास्त्र मानण्यात येऊ लागले आहे. संशोधकांनी एकत्रित केलेल्या साधनांचा अर्थ कसा लावावा त्यातून येणा-या इतिहासलेखनाला मानवी जीवनात काय स्थान द्यावे याबद्दल मागील अनेक वर्षापासून खल चालू आहे. भारतीय इतिहास लेखनाच्या संदर्भाने मात्र आधुनिक काळातील लेखन प्रक्रियेपूर्वी म्हणजे प्राचीन कालखंडात भारतीयांना इतिहासलेखनाची प्रक्रिया ज्ञान नव्हती. असे मत ११ व्या शतकात भारतात येऊन गेलेल्या अरबी प्रवाशी अल्बेरुनीने व्यक्त केले आहे. असे असले तरी इतिहासाला उपयुक्त ठरणारे साहित्य या काळात विपूल प्रमाणात निर्माण झाले. प्रा. वार्डर यांनी ॲन इन्ट्रॉडक्शन टू द इंडियन हिस्ट्रोग्रॉफी या ग्रंथात असे स्पष्ट केले आहे की भारतीय इतिहास लेखन प्रामुख्याने वैदिक काळापासून ते आधुनिक कालखंडापर्यंत झालेले आहे. फक्त ते असंघटीत स्वरुपात त्याचे सुसंगती लावावी  लागते. [१]

भूतकाळातील काही हरवलेले दूवे शोधून वा काही ऐतिहासिक सत्यावर प्रकाशझोत टाकून इतिहासकार ख-या अर्थाने गतकाळाचा पुन: प्रत्यय आणुन देतो त्याने दखल घेतली वा ना घेतली. तरी घडामोडी ह्या बाबी घडतच असतात. जसे अरण्यात एखादा वृक्ष ढासळतो तेव्हा तो ढासळतांना होणारा आवाज ऐकण्यास कोणी असो वा नसो तो वृक्ष पडतो हे सत्य असते. इतिहासकाराने संशोधन केल्याने किंवा काही दुवे शोधन काढल्याने अशा ऐतिहासिक सत्यावर प्रकाश पडतो. इतिहास लेखनाच्या या प्रक्रियेत मात्र शतकानुशतके विजेत्याकडुनच इतिहास लिहिला गेला आहे. प्युनिक युध्द्चा इतिहास हा कार्थजेनियन्सवर विजय मिळविणा-या रोमनांनी लिहिला, पेंगान्सवर विजय प्राप्त करणा-या ख्रिश्चनांनी विजयाचा टेंभा मिरविला, मेक्सिको व पेरु जिंकणा-या स्पॅनिशांनी विजयाचा इतिहास रचला व ॲझटेक्स-इंका चा जमातींना अपमानित केले.[१] तर व्यापाराच्या माध्यमातून भारत ताब्यात घेणा-या ब्रिटीशांनी प्रत्येक प्रादेशिक सत्तेचा इतिहास लिहितांना वंशश्रेष्ठत्वाचा प्रत्यय आणुन देत, तुटक, निवडक, पूर्वग्रहदुषित व जेतेपणाची भूमिका जणारे लिखाण केले.

ऐतिहासिक घटना या पूर्ण वस्तुनिष्ठ नसतात तर त्या अनिश्चित आणि व्यक्तीनिष्ठ असतात. रँकेच्या मते यासाठी कागदपत्रावर विश्वास ठेवावा लागतो ही कागदपत्रे आपल्या अधिकृतपणाचा पुरावा सादर करतात. परंतु ब्रिटिशप्रणित किंवा इतर विजेत्यांची कागदपत्रे आपल्या सोयीचे काही तरी सांगण्याचा प्रयत्न

करतांना आढळतात.[२] गतघटनांचा संग्रह करणे व त्यांचे योग्य मांडणी करणे यासाठी अशा कागदपत्रांवर अवलंबून रहावे लागते. संशोधकाला हा सर्वच्या सर्व संग्रह शक्य नसल्याने कर्तव्यनिष्ठ ग्रंथपालांनी ग्रंथाचा व हस्तलिखितांचा संग्रह केलेला असतो.

सरकारी अधिका-यांनी दप्तरांची सांभाळणी केलेली असते, तर संपादकांनी संपादन केलेले असते. याच शिदोरीवर संशोधकांचे कार्य सोपे होते. अशा दप्तराचा अर्थ लावणे याचे फार मोठी जबाबदारी संशोधकावर असते. नोंद दप्तरांचा संग्रह करणे, त्याचा अर्थ लावणे, भाष्य करणे व तत्वज्ञानाच्या चौकटीत लिखाण करणे असे कार्य करावे लागते. यासाठी प्रगल्भबुध्द्‌ी, स्वतंत्र व्यक्तीमत्व व अभिनव विचारशक्ती याची गरज असते. संशोधकाच्या संशोधनशक्तीला मार्यादा असल्यातरी, त्याच्या परिज्ञान शक्तीला मर्यादा नसतात. यातुनच इतिहासलेखन साकारते.

**प्राचीन कालखंड**

रामायण, महाभारत, पुराणे, सामवेदातील वंशब्राम्हण, ब्रहद्‌ारण्यके, उपनिषदातील वंश, ऋगवेदातील सांख्यायान, आरण्यके या भागातील वंश, श्रौत सुत्रातील गौत्र प्रवारांच्या याद्या, ऋगवेदातील गाथा, छदोंग्य उपनिषदातील इतिहास व पुराण यांना ज्ञान शाखा संबोधले आहे तर इतिहासाला पाचवा वेद मानले आहे. एफ. इ. पार्गीटल व अ.द. पुसाळकर यांनी तर अग्नी, वायू पुराणाधारे भारताच्या अतिप्राचीन इतिहासाची रुपरेखा आखली आहे. [२]

डॉ. मुजूमदार यांच्या मते प्राचीन भारतात काही प्रमाणात जे लिखाण झाले त्याचा दर्जा अपरिपक्व होता. डॉ. सुरेंद्रनाथ बॅनर्जीच्या मताचा भारतीयांनी लिखाण केलेलेही होते. परंतु काळाच्या ओघात किंवा परकिय आक्रमणादरम्यान लिखित साधने नष्ट झाली. [३] याउलट अथेन्स, रोम यांच्यात लढाया झाल्या, त्यांना सतत युध्द्‌ाचे प्रसंग होते. या लढायाचे वृत्तांत लिहून ठेवण्याची प्रवृत्ती अशा प्रसंगानुरुपच युरोप खंडात सुरु झाली. भारतात मात्र इतिहास ग्रंथाचा अभाव होता. कारण या देशाच्या सीमा अलंघ्यच असल्याने चीनप्रमाणेच देशातल्या देशात स्वस्थ व सुखरुप वातावरण होते. यामुळे युध्द्‌ाचे प्रसंग लिहिले गेलेच नाही.

ज्या देशामध्ये पाणिनि, वाल्मिकी, कालिदास, आर्यभटट्‌, भास्कराचार्य व गदाधरभटट्‌ यासारखी मंडळी निपजली त्यांची गणना मुर्खात करणे कठीण होय.[४] तत्वज्ञान, नाटयशास्त्र, व्याकरणशास्त्र, ज्योतिष्यशास्त्र, वैद्यकशास्त्र, कला व वास्तुकला या प्राचीन वारसाच्या जोरावर इतिहासलेखन करता येते कारण ती इतिहासाची साधने आहेत. वा.वि. मिराशींच्या मतानुसार प्राचीन काळी राजदरबारी प्रत्येक राजाच्या कारकीर्दीतील प्रमुख घटनांचे वर्णन लिहून ठेवण्याची पध्द्‌त होती. भुवनेश्वरजवळच्या हाथीगुंफा लेण्यात खारवेल (इ.स.पू. पहिले शतक) राजाच्या कारकीर्दीतील काही घटनांचे वर्णन कोरलेले आहे. बाणभटट्‌ाने हर्षचरित्र लिहिले. बिल्हणाने विक्रमांकदेवचरित, हेमचंद्राने कुमारपालचरित, संध्याकार नंदीने रामचरित व मेरुतुंगाने प्रबंधचिंतामणी असे लिखाण झाले आहे. तसेच कल्हणाने राजतरंगिनी या ग्रंथामध्ये सुव्रत क्षेमेंद्र

यांच्याही पूर्वी होऊन गेलेल्या अकरा इतिहासकारांच्या ग्रंथाचा उल्लेख केला आहे. त्याने अनेक प्रशस्त्या, दानपत्रे, कोरीव लेख, हस्तलिखित ग्रंथ व नाणी याचा अभ्यास केला व ती माहिती या ग्रंथात दिली आहे. इतिहासकाराच्या अंगी निपक्षपातीपणा असलाच पाहिजे याची कल्हणला जाणीव होती. तो लिहितो की,

श्लाघ्य:स एव गुणवान रागध्देष बहिष्कृता

भूतार्थकथने यस्य स्थेयस्थेव सरस्वती

अर्थात ज्याची वाणी प्रेम व द्वेष यापासून मुक्त असून सत्यार्थ कथनात अत्यंत निश्चित असते तोच गुणी (इतिहासकार) होय.[५] त्याप्रमाणे जैन व बौध्द् या धर्मिय साहित्यातून प्राचिन काळातील राजांची वंशावळी व त्यांचे प्रदेश याची माहिती मिळते.

थोडक्याच सामान्य व्यक्तींनी केलेले काम, राजाने केलेल्या लढाया, लूटमार, फसवणूक, वध, विविध राजघराण्यांचा उदय, अस्त या घटना लिहून ठेवाव्यात यासाठी लागणारी दृष्टी भारतीयांकडे नव्हती, त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन अध्यात्मिक होता. आत्मा, परमात्वा व मुक्ती याकडे भारतीयांचे लक्ष असल्याने गुढगुंजन, परिकथा, देव, त्याचे अवतार या संकल्पनांच्या पलीकडे भारतीय दृष्टीकोन राहिला नाही. भारतातील प्रत्येक कला देवदेवतांच्या माध्यमातून मांडली गेली तर ग्रीकांनी प्रत्येक कला स्त्री-पुरुषांच्या रुपाने मांडली हा फरक दिसून येतो. यामुळे भारतात इतिहासलेखन शास्त्राच्या विकासाला पुरक वातावरण निर्माण झाले नाही.

## मध्ययुगीन सुलतान कालखंड

मध्ययुगीन कालखंडामध्ये दिल्लीच्या सुलतान कालखंडाचा इतिहास विशेषत: घोरी व गुलाम वंशापासून ते सय्यद लोदी घराण्यापर्यंतचा इतिहास हा तवारीखांमधून मिळतो. अन्साब (मुबारकशहा), तबकात-इ-नासिरी (मिहाज-जूइझ्झानीची), तारिख-ऐ-मुहम्मदी (मुहम्मद-मिहामदखानी), तारिख-ए-फिरुझशाही (शम्स अलदीन-सिराज अफीक) या व बरनीच्या तवारिखेत तत्कालिन शासन, अर्थव्यवस्था आणि प्रसिध्द् व्यक्ती यांची माहिती मिळते. दुर्देवाने या तवारिखांचा मोठा दोष म्हणजे चिकित्सेचा अभाव, कथा सजवणे, विवरण देण्यापेक्षा वर्णन करणे यावर भर दिसतो.

## मध्ययुगीन मोगल कालखंड

मोगलकाळातील लिखाणही असेच विश्वासार्हतेच्या कसोटीवर टिकणारे दिसत नाही परंतु तपशिल मात्र आढळतो. जसे अबुल फझलचा अकबरनामा, मुअदमिदखानाचे मआसिर-इ-जहाँगिरी, इकबाल-नामा-इ-जहाँगिरी आणि अब्दुल हमीद लाहोरीचा बादशहानामा, मुहम्मद कासीमचा अलमगीरमाना याचा तपशिल देणारे लिखाण यात सामावेश करता येतो. याशिवाय वाड्मयीन दृष्टया श्रेष्ठ परंतु इतिहासलेखनाच्या प्रक्रियेत कमी पडणारे ऐतिहासिक ग्रंथ या काळात निर्माण झाले. जसे निजामुदद्दीनचा तबकात-इ-अबकारी, अब्दुल कादिर बदाअनीची मन्तखबुत्तवारीख, औरंगजेबाचा सेवक मुस्तइदखान याचा मआसिर-ए-आलमगिर

याचा समावेश होतो. तसेच दरबारी इतिहासकार खाफीखान याचा मुन्तखब-अल्लुबाब हा ग्रंथ महत्वाचा आहे. परंतु तो औरंगजेबाच्या मृत्यूनंतर ब-याच काळाने लिहिल्या गेला आहे. या काळात आठवणी प्रकारातील लिखाण प्रामुख्याने सम्राट बाबर, जहांगीर व हुमायूनची बहिण गुलबदनबेगम यांनी केले. हे लिखाण ऐतिहासिक वाड्मय या अर्थाने श्रेष्ठ परंतु ते इतिहास ठरत नाही. अशा प्रकारच्या मोगलकालीन इतिहासलेखनाची सुची मार्शल स्टोरी व श्रीराम शर्मा यांनी प्रकाशित केल्या आहेत.[६] संपूर्ण भारतात ज्या-ज्या ठिकाणी मुस्लीम अंमल स्थापन झाला त्या-त्या सर्व ठिकाणी तवारिखा लिहिल्या गेल्या. द. भारता सुध्दा अझीझुल्ला तबातबाई (बहमनी व निजामशाही) रफीउद्दीन शीराझी (आदिलशाही) शेख झैनुद्दीन (मलबरातील मुस्लीम सत्ता) बुर्हान इष्न हसन (अर्काटचे नवाब) या तवारिखां लिहिल्या गेल्या पूर्व भारत गुलाम हुसन सलीम (बंगाल) मिर्झानाथन (आसाम) तर पश्चिम भारतात सिकंदर मंझ (गुजरात) अशा तवारिखांचे लिखाण झाले. यांचा इस्लामी अंमलाखाली असलेल्या भारताची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अभ्यास करावाच लागतो.

**संदर्भ :**

१.राजदरेकर सुहास, इतिहासलेखन शास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९४८, पृ. ७०

२.जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश, खंड-२, पृ. ५१४

३.राजदरेकर सुहास, इतिहासलेखन शास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९४८, पृ. ७१

४.फडतुले निर्मलकुमार, संपादक-विष्णू शास्त्री चिपळूणकर निबंधमालेतील तीन निबंध, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७८, पहिली आवृत्ती, पृ. ७४-७६

५. डॉ. देशपांडे, सुरेश रघुनाथ - मराठेशाहीचे आधुनिक भाष्यकार, गोकुळ मासिक प्रकाशन, सदाशिव पेठ-पुणे, १९९४, पृ. ७.

६.जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश, खंड-२, पृ. ५०९